महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३०३ वे | दिनांक : ३१/१०/२०२६ | वार : शनिवार

महाराष्ट्रात मोठ्या राजकीय भूकंपाचे संकेत; शिरसाटांचे सूचक वक्तव्य

छत्रपती संभाजीनगर : विधानपरिषद निवडणुकीच्या निकालानंतर महायुतीमधील घटकपक्षांमध्ये सुरू असलेली जुंपली असतानाच, शिंदे सेनेचे नेते आणि राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आगामी काळात मोठ्या भूकंपाचे संकेत दिले आहेत. "येत्या 3 ते 4 महिन्यांत राज्यात प्रचंड मोठ्या घडामोडी घडणार असून राजकीय पटलावर मोठी उलथापालथ होण्याची शक्यता आहे. एकीकडे मुख्यमंत्री बदलाची चर्चा रंगते, तर दुसरीकडे एकनाथ शिंदेंचे नाव पुढे येते. ही सर्व समीकरणे सध्या अत्यंत कन्फ्युज करणारी आहेत. त्यामुळे नेमके काय घडेल हे खात्रीने सांगता येणार नाही; पण पडद्यामागे निश्चितच काहीतरी मोठे शिजत आहे," असा थेट आणि सूचक दावा संजय शिरसाट यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना केला आहे. भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांच्या विधानांवरून निर्माण झालेला तणाव, काल 29 ऑक्टोबर रोजी मुंबईत पार पडलेला अराजकीय कार्यक्रम आणि त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह ठाकरे बंधूंची (उद्धव ठाकरे व राज ठाकरे) उपस्थिती या पार्श्वभूमीवर शिरसाट यांनी मांडलेली ही भूमिका सध्या राजकीय वर्तुळात प्रचंड चर्चेचा विषय ठरली आहे. राज्यातील सध्याच्या राजकीय घडामोडींवर एका वृत्तवाहिनीशी बोलताना मंत्री संजय शिरसाट यांनी सविस्तर भाष्य केले. "आता नेमकं काय चालू आहे हे थेट सांगता येणार नाही. एकीकडे मुख्यमंत्री बदलाची भाषा सुरू होते, तर दुसरीकडे पुन्हा एकदा एकनाथ शिंदे यांचेच नाव पुढे केले जाते. ही सर्व समीकरणे सध्या संभ्रम निर्माण करणारी (कन्फ्युज करणारी) आहेत. त्यामुळे आत्ताच याविषयी खात्रीलायक काही सांगणे कठीण आहे.“ "सध्याच्या परिस्थितीवरून खात्रीने दावा करता येत नसला, तरी राजकारणातील जाणकार मंडळी ज्या पद्धतीचे संकेत देत आहेत, त्यावरून पडद्यामागे काही ना काही घडामोडी नक्कीच वेगाने सुरू आहेत. पुढील 3 ते 4 महिन्यांत राज्यात मोठी उलथापालथ होण्याची दाट शक्यता आहे. एकनाथ शिंदे हे सर्वसामान्यांचे नेते (कॉमन मॅन) आहेत. त्यामुळे येणारे वर्ष हे शिवसेनेचे असेल आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाबाबत सुरू असलेल्या चर्चांकडे दुर्लक्ष करता येणार ही."मुंबईत काल 29 ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या एका पुस्तक प्रकाशन कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे एकाच मंचावर आले होते. या भेटीवर भाष्य करताना शिरसाट म्हणाले, "ठाकरे बंधू आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एका मंचावर आले म्हणजे लगेच राज्यात काही नवी राजकीय समीकरणे उदयाला येतील, असे म्हणणे चुकीचे आहे. सार्वजनिक आणि कला क्षेत्रातील कार्यक्रमात नेते एकमेकांना भेटत असतात.“ "या भेटीमागे मूळ संशोधनाचा विषय काय असेल, तर भाजप नेते आशिष शेलार आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यामध्ये झालेला नेमका संवाद! त्या दोघांमध्ये काय चर्चा झाली, काही राजकीय रणनीती ठरली आहे का, हे तपासणे अधिक महत्त्वाचे आहे," असा थेट संशय त्यांनी व्यक्त केला. भाजप प्रवक्ते नवनाथ बन यांनी शिवसेना नेत्यांवर केलेल्या आक्रमक टीकेचा शिरसाट यांनी कडक शब्दांत समाचार घेतला.

धंगेकरांवर किशोरी पेडणेकरांचा पलटवार; २०२२ मधील विश्वासघाताची आठवण करून दिली

मुंबई : "रवींद्र धंगेकरांसारख्या लोकांना कोणी किती गांभीर्याने घ्यायचे? पक्ष बदलत फिरत राहायचे आणि प्रसिद्धीसाठी वाटेल तशी विधाने करायची. 2022 मध्ये ज्यांनी उद्धवजींच्या पाठीत उघडपणे खंजीर खुपसला, त्यांना धंगेकर 'एक रक्त' कसे काय म्हणू शकतात? आमच्या पक्षात किंवा नेतृत्वात अशा मनोमिलनाची कोणतीही चर्चा नाही आणि ती कधी होईल असे वाटतही नाही," अशा शब्दांत मुंबईच्या माजी महापौर तथा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेत्या किशोरी पेडणेकर यांनी रवींद्र धंगेकरांच्या दाव्याची हवा काढली. त्याचवेळी दादर येथील एका कला क्षेत्राच्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि ठाकरे बंधू (उद्धव ठाकरे व राज ठाकरे) एकाच मंचावर आल्याच्या घटनेवर बोलताना, "फडणवीस घराणे आणि ठाकरे घराणे ही दोन्ही महाराष्ट्रातील अत्यंत सुसंस्कृत घराणी आहेत. त्यांनी एका मंचावर एकत्र येऊन महाराष्ट्राची उच्च राजकीय संस्कृती जपली, हे पाहून संपूर्ण महाराष्ट्राला नक्कीच समाधान वाटले," अशी सकारात्मक प्रतिक्रिया त्यांनी दिली. मुंबईत पत्रकारांशी संवाद साधताना किशोरी पेडणेकर यांनी ठाण्यातील प्रदीप पूर्णेकर हत्या प्रकरणातील पोलिसांचा संथ तपास, अमित साटम यांचे वृक्षतोडीवरील आरोप, संजय गायकवाड यांची विधाने आणि महायुतीतील अंतर्गत कलहावर टोलेबाजी केली. ठाण्यातील ठाकरे गटाचे विभागप्रमुख प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्याकांडावर पोलिसांच्या तपासाची लक्तरे वेशीवर टांगताना पेडणेकर म्हणाल्या, "वागळे किंवा ठाण्यातील त्या टायगर श्रॉफच्या प्रकरणात पोलीस आणि नेते पटापट धावून जातात आणि तातडीने कारवाई होते. मात्र, पूर्णेकर हत्याकांडाला आज 27 ते 28 दिवस उलटून महिना होत आला, तरी मूळ सूत्रधारांवर कारवाई का होत नाही? राजकीय वैमनस्यातून ही निर्घृण हत्या झाली आहे का, याचे उत्तर पोलिसांनी दिले पाहिजे.“ "काल ठाण्यात शिंदे सेनेने आंदोलन केले, तेव्हा त्यांच्याच पक्षातील ठाण्याचे स्थानिक नगरसेवक अनुपस्थित होते. 'आम्ही एकनाथ शिंदेंसाठी येऊ, पण मिनाक्षी शिंदेंसाठी येणार नाही' अशी चर्चा त्यांच्या अंतर्गत गोटात आहे. आम्हाला त्यांच्या वादात पडायचे नाही; पण एका निष्पाप कार्यकर्त्याच्या कुटुंबाला न्याय मिळायलाच हवा.“ मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांनी 2005 मधील मध्य वैतरणा प्रकल्पातील वृक्षतोडीवरून केलेल्या आरोपांना त्यांनी सडेतोड उत्तर दिले. "मध्य वैतरणा प्रकल्प शिवसेनेच्या सत्ताकाळात झाला आणि त्यामुळेच आज लाखो मुंबईकरांची तहान भागत आहे. या प्रकल्पात झाडे कापली गेली आणि बीडमध्ये भरपाई म्हणून झाडे लावली नाहीत, असा बालिश कांगावा साटम करत आहेत. 2005च्या महापालिकेत भाजप शिवसेनेसोबत सत्तेत नव्हती का? स्वतः अमित साटम महापालिकेत नगरसेवक होते, मग तेव्हा ते काय गाई-म्हशी हाकत होते की झोपा काढत होते?“ "केंद्रात आणि राज्यात तुमचेच सरकार आहे. जर तुमच्यात दम असेल, तर तोंडाच्या वाफा दवडण्यापेक्षा आणि पत्रकार परिषदा घेण्यापेक्षा थेट अधिकृत चौकशी लावा आणि दोषींवर कारवाई करा. उगीच चौथ्या इयत्तेतील मुलासारखे बालिश राजकारण करू नका."

महायुतीतील वाद चिघळला; भाजपचा शिवसेनेला इशारा, धंगेकरांवरही निशाणा

मुंबई : महायुतीविरोधात काम करणारे रवींद्र धंगेकर अब्दुल, सत्तार यांच्यावर कारवाई करा, महायुती टिकवायची असेल तर झारीतले शुक्राचार्य रोखा, असा खणखणीत इशारा भाजपने आज शिवसेनेला दिला. भाजपचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी आज पत्रकार परिषद घेत शिवसेनेचे रवींद्र धंगेकर यांचा माकडछाप म्हणून उल्लेख केला. नवनाथ बन यांनी काल भूमिका मांडल्यानंतर त्यांच्या समर्थनार्थ प्रवीण दरेकरांसह भाजपचे इतर नेते मैदानात उतरले. आज पुन्हा विधान परिषद निवडणूक निकालावरून महायुतीमध्ये जोरदार जुंपली आहे. "ज्यांनी राजकीय कारकिर्दीसाठी 12 पक्ष फिरले, ज्यांच्या घरातील लोकांचे पुणे महापालिकेत डिपॉझिट जप्त झाले आणि ज्यांना पुणेकरांनी लोकसभा व विधानसभेत घरी बसवले, त्या 'माकडछाप' व्यक्तीने देवेंद्र फडणवीस आणि भाजपवर बोलण्याची लायकी नाही. महायुतीत राहून पुण्यात भाजप उमेदवार स्मिता जाधव यांच्याविरोधात अधिकृत सोशल मीडिया पेजवरून प्रचार करणाऱ्या रवींद्र धंगेकरांवर आणि छत्रपती संभाजीनगरमध्ये उघडपणे बंडखोरी करणाऱ्या अब्दुल सत्तारांवर शिवसेना काय कारवाई करणार? अमरावतीत बंडखोरांवर भाजपने ६ वर्षांसाठी निलंबनाची कुऱ्हाड चालवली, मग शिवसेनेनेही धंगेकर आणि सत्तारांवर तशीच कठोर कारवाई करून युतीधर्म पाळावा," असा सणसणीत आणि थेट सवाल भारतीय जनता पक्षाचे मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यांनी उपस्थित केला आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मनपा प्रा.व मा. वि. चिकलठाणा शाळेत विशेष पालक सभा

छत्रपती संभाजीनगर : आज दिनांक 30/10/2026 रोजी मनपा प्रा. व मा. वि. शाळेमध्ये शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. वसंत राठोड यांच्या अध्यक्षतेखाली विशेष पालक सभेचे आयोजन करण्यात आले होते .या पालक सभेमध्ये सद्यस्थितीमध्ये उपस्थित असलेल्या तसेच भविष्यात भेडसावणाऱ्या पाणीटंचाई आणि पाणीबचत या संबंधित पालकांना छत्रपती संभाजीनगर शहराचे मा. मनपा आयुक्त श्री. अमोलजी येडगे साहेब यांच्या मार्गदर्शक सूचना आणि त्यांनी जनजागृतीसाठी आणि जाणिवजागृतीसाठी तयार केलेला व्हिडिओ यांचे सादरीकरण करण्यात आले. या संबधीत काही प्रमुख मार्गदर्शक सुचना आणि आपली जबाबदारी या संदर्भात श्री. राठोड सरांनी मार्गदर्शन केले.तसेच या पालक सभेमध्ये विद्यार्थ्यांची शालेय गुणवत्ता या संदर्भात श्री. जावेद पठाण सरांनी मार्गदर्शन केले. वय 14 ते 15 वर्षे वयागटातील मुलींसाठी एचपीव्ही या लस्सीच्या संदर्भात श्रीम. संगीता चव्हाण आणि श्रीम. मनिषा शिंदे यांनी पालकांना मार्गदर्शन आले. तसेच दिवाळी अभ्यास या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करून पालकांना सूचना देण्यात आल्या. या पालक सभेसाठी मोठ्या संख्येने पालक वर्ग उपस्थित होता. ही पालक सभा यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. वसंत राठोड तसेचश्रीम. बेबी राऊत,श्री .पठाण, श्री. सूर्यवंशी,श्रीम. मनीषा शिंदे, श्रीम.अर्चना भारद्वाज, श्रीम. संगीता चव्हाण, श्रीम. भिंगोले मॅडम तसेच सेवक वर्ग यांनी परिश्रम घेतले.

महाराष्ट्र दुष्काळ निर्मूलनासाठी २३ जिल्ह्यांतील २०० संस्थांचा पुढाकार; सरकारसोबत काम करण्याचा निर्धार

पाऊस आलाच नाही खरीप वाया गेलं रब्बी पेरलीच नाही संपूर्ण महाराष्ट्रातील बळीराजा संकटात आला, शिवाय शेतकरी शेतमजूर भूमिहीन कष्टकरी एकल महिला सुद्धा दुष्काळामुळे संकटात आले सध्याची वेळ ही सरकारसोबत कोणत्याही मुद्द्यावर भांडण्याची नसून तर लोकांच्यासाठी सरकार ज्या ज्या योजना राबवत आहे त्या योजना लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी सरकारसोबत मिळून काम करण्याचा निर्धार स्वयंसेवी संस्थांनी केला महाराष्ट्रातल्या सर्व विभागातील २३ जिल्ह्यातील संस्था ज्या प्रत्यक्ष ग्रामीण भागात लोकांसोबत काम करणाऱ्या संस्थांनी हा निर्धार केलेला आहे विदर्भ मराठवाडा पश्चिम महाराष्ट्र उत्तर महाराष्ट्र अशा सर्व विभागातून संस्थांची उपस्थिती या परिषदेला होती या परिषदेमध्ये सर्वांनी मिळून सर्वानुमते दुष्काळामध्ये काम करण्याची ठराव पारित केलेले आहेत.. हे सर्व ठराव राज्याची मुख्यमंत्री माननीय देवेंद्रजी फडणवीस साहेब उपमुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री माननीय सुनेत्रा ताई पवार यांच्याकडे पाठवले*महाराष्ट्र दुष्काळ निर्मूलन संकल्प अभियान परिषदेनी केले ठराव पाठवले जाणार आहेत. मुख्यता महाराष्ट्रात भविष्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई, वाढणार आहे. जनावरांना पिण्याचे पाणी आणि चारा ही सुद्धा मोठी समस्या निर्माण होणार आहे... ग्रामीण जनतेला रोजगाराचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर भेडसावणार आहे. या पार्श्वभूमीवर परिषदेमध्ये खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आले. 1. सध्या ग्रामीण शेतकरी शेतमजूर दुप्त्या जनावरांच्या माध्यमातून आपली उपजीविका भागवत आहेत अशा दुधाच्या जनावरांना चारा छावणीमध्ये सोडणं शक्य नाही कारण या जनावराची किंमत एक ते दीड लाख आहे.. आणि म्हणून प्रत्येक गावात जनावरांना पिण्याच्या पाण्याचा पाणोठा आणि जनावरांना प्रत्येक गावात चारा डेपो निर्माण करण्याची गरज आहे आणि तो सरकारने निर्माण करावा.. या कामांमध्ये चारा वाटप पाणी नियोजन पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे कामी संस्था सरकार सोबत कार्य करतील... सर्वानुमते हा ठराव मान्य करण्यात आला. 2. सध्या मराठवाड्यामध्ये ठिकठिकाणी ऊस दिसतो हाऊस सध्या कारखान्यांना पाठवणं उचित नाही जे क्षेत्र उसाचे आहे तिथे थोडेफार पाणी आहे म्हणून हाऊस कारखान्याला न पाठवता जनावरांसाठी खाद्य म्हणून वापरण्यात यावा. आणि सहा हजार रुपये टन याप्रमाणे शासनाने शेतकऱ्यास रक्कम अदा करावी.... 3. महात्मा गांधी रोजगार हमी योजना आणि या योजनेच्या अंतर्गत येणारी प्रत्येक काम हे शेती मशागतीच करावं विहीर पुनर्भरण बोरवेल पुनर्भरण जलतारा म्हणजे पुढच्या पावसाळ्यामध्ये प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतात पडणारं पाणी त्याच्याच विहिरीला किंवा बोरला मिळाला पाहिजे इतकं सक्षम काम रोजगार हमी मध्ये प्रत्येक गावात करण्यात यावं या कामाच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त गावांमध्ये रोजगार निर्मिती करावी , या कामांमध्ये स्वयंसेवी सामाजिक संस्थांना जोडण्यात यावं. 4. पाण्याअभावी राज्यातील अनेक तलाव कोरडे पडणार आहेत या कोरड्या पडलेल्या तळ्यातील गाळ काढून पडीक आणि नापीक जमिनीवरती टाकून त्याची सूपीकेता वाढवावी.. प्रत्येक गावात ही सर्व काम. सि एस आर च्या माध्यमातून करावीत.. या कामांमध्ये सुद्धा कामाच्या व्यवस्थापनासाठी आणि गुणवत्ता पूर्ण काम होण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना या कामासोबत जोडावे. 5. दुष्काळ एक आपत्ती आहे या आपत्तीचे निवारण करण्यासाठी आपत्ती निवारण कक्ष प्रत्येक जिल्ह्याला निर्माण करावा आणि महाराष्ट्र लोकविकास मंचाचे प्रतिनिधी संस्था जिल्हा निहाय या आपत्ती कक्षाला संस्थाना जोडण्यात याव्या7.शेतकरी शेतमजूर यांच्यावर असलेल्या कर्जाची परतफेड शासनाने करावी. शेतकरी आणि शेतमजूर कर्जमुक्त करावा. 8. विद्यार्थ्यांची सर्व शैक्षणिक फीस सरकारने माफ करावी. 9.सध्या अस्तित्वात असलेली गावातील आणि शेतीतील बोरवेल विहिरी अधिग्रहण करून मोजक्या पाण्यावरती जनावरांसाठी चारा निर्माण करावा. गावात माणसांसाठी आणि प्राण्यांसाठी योग्य पाण्याचे नियोजन करून पाणीपुरवठा करण्यात यावा. परिषदेमध्ये वरील प्रमाणे सर्वानुमते ठराव करण्यात आले या ठरावाला प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र लोकविकास मंचच्या सदस्य संस्था या कार्यरत राहतील असे सर्वानुमते ठरवण्यात आले.

भूमिपुत्र वाघ
छत्रपती संभाजीनगर

जिंतूर शहरातील खोदकाम, केबल टाकण्याचे काम आणि रस्त्यांच्या दुरावस्थेवर प्रश्नचिन्ह

जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : जिंतूर शहरातील रस्त्यांची दुरवस्था, विविध विकासकामांसाठी करण्यात येणारे खोदकाम, भूमिगत केबल टाकण्याची कामे, पाणीपुरवठ्याशी संबंधित अडचणी तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेच्या प्रश्नांवर नगर परिषद नियोजन व विकास समितीचे सभापती तथा नगरसेवक ॲड. गोपाळ नागोराव रोकडे यांनी आवाज उठवला आहे. या संदर्भात त्यांनी २८ ऑक्टोबर २०२६ रोजी नगर परिषद प्रशासनाकडे लेखी निवेदन सादर करून संबंधित कामांची तपासणी व आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.परवानगीच्या अटींचे पालन होते का?शहरात रस्ते खोदून केबल टाकण्याच्या कामासाठी संबंधित कंपनीला परवानगी देण्यात आली असली, तरी प्रत्यक्षात काम करताना परवानगीतील अटींचे पालन होत आहे का, याची तपासणी होणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. रस्ते खोदकामानंतर त्यांची योग्य पद्धतीने दुरुस्ती न झाल्यास नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे संबंधित कामांचे परीक्षण करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे.खोदकामामुळे अपघाताचा धोकाशहरातील विविध भागांत सुरू असलेल्या खोदकामामुळे रस्त्यांवर खड्डे निर्माण होणे, माती व बांधकाम साहित्य पडून राहणे आणि वाहतुकीस अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत दुचाकीस्वार, पादचारी तसेच शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे कामाच्या ठिकाणी योग्य सुरक्षा व्यवस्था करणे आणि खोदलेले रस्ते तातडीने पूर्ववत करणे गरजेचे असल्याचे निवेदनातून अधोरेखित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६

महाराष्ट्रातील संघटनात्मक विस्तारावर उपेंद्र कुशवाह समाधानी; कार्यकर्त्यांना विस्ताराचे निर्देश

नवी दिल्ली : राष्ट्रीय लोक मोर्चा पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार आदरणीय मा. श्री. उपेंद्र कुशवाह जी यांची नवी दिल्ली येथील 1, ताल कटोरा रोड येथे राष्ट्रीय लोक मोर्चा पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. श्री. बाबासाहेब संभाजी पठारे यांनी सदिच्छा भेट घेतली. यावेळी आगामी दिवाळी सणाच्या निमित्ताने त्यांनी कुशवाह साहेबांना शुभेच्छा दिल्या. या भेटीदरम्यान महाराष्ट्रातील पक्षाचा संघटनात्मक विस्तार, आगामी राजकीय वाटचाल, कार्यकर्त्यांचे प्रश्न तसेच सामाजिक व राजकीय विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.महाराष्ट्रात राष्ट्रीय लोक मोर्चा पार्टीचा वेगाने होत असलेला विस्तार आणि संघटनात्मक बांधणीबाबत राष्ट्रीय अध्यक्ष उपेंद्र कुशवाह यांनी समाधान व्यक्त केले. तसेच महाराष्ट्रातील पक्ष संघटना अधिक मजबूत आणि गतिमान करण्यासाठी त्यांनी प्रदेशाध्यक्ष बाबासाहेब पठारे यांना महत्त्वपूर्ण मार्गदर्शन व सूचना केल्या.बैठकीत राष्ट्रीय अध्यक्षांनी पुढील महत्त्वपूर्ण सूचना केल्या :महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाध्यक्षाने नियमितपणे जिल्हास्तरीय बैठका घेऊन संघटनात्मक कामाचा आढावा घ्यावा.प्रत्येक विभागीय अध्यक्षाने विभागीय बैठका आयोजित करून जिल्हा संघटनांमध्ये समन्वय वाढवावा.दर तीन महिन्यांनी प्रत्येक विभागात भव्य कार्यकर्ता मेळावा आयोजित करावा.प्रत्येक जिल्ह्यात पक्षाची सदस्य नोंदणी मोहीम अधिक प्रभावीपणे राबवून जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडावे.राष्ट्रीय लोक मोर्चा हा NDA चा घटक पक्ष असून केंद्रात तसेच महाराष्ट्रात NDA सरकार सत्तेत आहे. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना गोरगरीब, वंचित आणि गरजू जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रिय भूमिका बजावावी.प्रत्येक गरजू नागरिकाला शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी मदत व सहकार्य करावे.जिल्हा, विभागीय किंवा प्रदेश कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांनी प्रामाणिकपणे व सक्रियपणे काम करणे अपेक्षित आहे. कामात निष्क्रियता किंवा जबाबदारीचे पालन न झाल्यास त्या पदावर दुसऱ्या सक्षम व कार्यक्षम कार्यकर्त्याची नियुक्ती करण्यात यावी.महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हाध्यक्षाकडून संघटनात्मक कामाचा नियमित अहवाल घेऊन तो राष्ट्रीय कार्यकारिणीच्या दर तीन महिन्यांनी होणाऱ्या बैठकीत सादर करावा.प्रदेशाध्यक्षांनी NDA सरकारमधील संबंधित मंत्र्यांच्या संपर्कात राहून पक्षाच्या कार्यकर्त्यांना जिल्हास्तरावर पालकमंत्र्यांची भेट घडवून आणावी. तसेच विविध शासकीय समित्यांवर पक्षाच्या कार्यकर्त्यांना संधी मिळण्यासाठी कार्यकर्त्यांची नावे व प्रस्तावित यादी राष्ट्रीय अध्यक्षांकडे सादर करावी.डिसेंबरमधील महाराष्ट्र कार्यकर्ता मार्गदर्शन शिबिराचे नियोजनडिसेंबर महिन्यात मुंबई, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय लोक मोर्चा पार्टीच्या कार्यकर्ता मार्गदर्शन शिबिराबाबतही सविस्तर चर्चा झाली. दिवाळीनंतर महाराष्ट्रातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन शिबिराचे नियोजन, कार्यक्रमाची रूपरेषा, कार्यकर्त्यांची उपस्थिती आणि संघटनात्मक तयारी यासंदर्भातील सविस्तर अहवाल राष्ट्रीय अध्यक्षांकडे सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या.या शिबिराच्या माध्यमातून महाराष्ट्रातील पक्ष संघटनेला नवी दिशा देणे, कार्यकर्त्यांना वैचारिक व संघटनात्मक मार्गदर्शन करणे आणि आगामी राजकीय वाटचालीसाठी मजबूत संघटन उभारणे हा प्रमुख उद्देश असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.बाबासाहेब पठारे यांचा संघटनात्मक विस्ताराचा निर्धारराष्ट्रीय अध्यक्ष उपेंद्र कुशवाह यांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्रात राष्ट्रीय लोक मोर्चा पार्टीचे संघटन तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी जिल्हा, विभाग, तालुका आणि गावपातळीवर संघटनात्मक बांधणी अधिक वेगाने करण्यात येईल. तसेच केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी पक्षाचे कार्यकर्ते सक्रियपणे काम करतील, असा विश्वास महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष बाबासाहेब संभाजी पठारे यांनी व्यक्त केला.या भेटीमुळे महाराष्ट्रातील राष्ट्रीय लोक मोर्चा पार्टीच्या आगामी संघटनात्मक आणि राजकीय वाटचालीला नवी दिशा व गती मिळणार असल्याचे मानले जात आहे.मा. बाबासाहेब संभाजी पठारेप्रदेश अध्यक्ष, महाराष्ट्रराष्ट्रीय लोक मोर्चा पार्टी

गोरख वाघ

सुखना नदीच्या काठावर वसलेलं देशगव्हाण हे आमचं छोटंसं गाव. या नदीने आम्हाला केवळ पाणीच दिलं नाही तर संस्कार, संस्कृती आणि माणुसकीची ओलही दिली. गावात प्रामुख्याने हुश्याचीच घरं. पण त्यासोबतच काही घरं अशी आहेत की ती मूळची या गावची नाहीत. ती बाहेरगावाहून पाहुणी म्हणून आली आणि या मातीवर इतकी प्रेम करू लागली की याच मातीची झाली. रक्ताच्या नात्यापेक्षा मातीचं नातं मोठं असतं, हे अशा घरांनी दाखवून दिलं आहे. अशाच घरांपैकी एक घर म्हणजे वाघाचं घर आणि या घराचा कणा, आधारस्तंभ म्हणजे गोरख वाघ. गावच्या शाळेजवळच संत भगवान बाबा मंदिरा मागे त्यांचे घर आहे.गोरख वाघ यांचे मूळ गाव मांजरगाव, तालुका बदनापूर, जिल्हा जालना. सुमारे चार-पाच दशकांपूर्वी ते उपजीविकेसाठी किंवा नातेसंबंधातून आमच्या गावात आले. सुरुवातीला ते पाहुणे होते, पण त्यांच्या स्वभावाने, त्यांच्या माणसकीने त्यांनी अवघं गाव आपलंसं केलं. आज त्यांना कोणी बाहेरचा म्हणत नाही. ते या गावचेच आहेत, या मातीचेच आहेत.मी त्यांना लहानपणापासून पाहत आलोय. माझ्या बालपणीच्या आठवणीत त्यांच्या अनेक प्रतिमा आहेत. कधी ते शेतात काम करताना दिसायचे, कधी गावच्या पारावर राजकारणाची चर्चा करताना, तर कधी मंदिरात टाळ घेऊन भजन म्हणताना. गोरख वाघ म्हणजे एक हरहुन्नरी, अष्टपैलू व्यक्तिमत्त्व. त्यांच्या अंगी नाना कला व नाना कळाही वसतात असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही.राजकारण म्हटलं तर राजकारणात त्यांचा वावर, समाजकारणात त्यांचा सक्रिय सहभाग, छोट्या-मोठ्या व्यवसायात त्यांची हुशारी, तर दुसरीकडे भजन, पोथी, कीर्तन, भारूड या अध्यात्मिक आणि लोककलेच्या क्षेत्रातही त्यांना तितकीच ओढ. त्यांनी आयुष्यात कोणतंच क्षेत्र सोडलं नाही. ज्या क्षेत्रात जातील तिथे आपल्या बुद्धिमत्तेचा, आपल्या अनुभवाचा ठसा उमटवणार. पण गंमत अशी की ते एकाच क्षेत्रात फार काळ रमत नाहीत. सतत काहीतरी नवीन करण्याची, शिकण्याची त्यांची धडपड आजही कायम आहे. प्रचंड बुद्धिमत्ता आहे, मात्र ते स्थिर राहत नाहीत.गावात पूर्वी भारूडाची एक प्रसिद्ध टीम होती. आजच्या पिढीला कदाचित भारूड म्हणजे काय हे फारसं माहितीही नसेल. पण आमच्या लहानपणी वर्षातून एकदा, विशेषतः यात्रेच्या किंवा एखाद्या धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने मारुतीच्या मंदिरासमोर या टीमचा कार्यक्रम ठरलेला असायचा. सारा गाव त्या रात्री मंदिरासमोर लोटायचा. त्या टीममधले एक प्रमुख आणि लोकप्रिय भारूडकार म्हणजे गोरख वाघ. त्यांच्या तोंडातून निघणारे संत एकनाथांचे भारूड, त्यात असलेली विनोदाची, उपहासाची फोडणी आणि त्यांच्या सादरीकरणाची लकब काही औरच होती.त्यांच्याकडे आजही एक देखणा, तगडा घोडा आहे. आजच्या मोटारसायकल आणि चारचाकीच्या जमान्यात घोडा बाळगणं आणि त्याला जपणं ही सोपी गोष्ट नाही. पण वाघांनी तो छंद आजही जपलाय. कधी कधी सकाळी ते अगदी रुबाबात घोड्यावरून गावात फेरफटका मारतात. त्यावेळी त्यांना पाहणं हा एक वेगळाच अनुभव असतो.त्यांचा आणखी एक नित्यक्रम म्हणजे सकाळचा गीतापाठ. रोज पहाटे, महादेवाच्या मंदिरासमोर ते मोठ्या, स्पष्ट आणि अत्यंत शुद्ध उच्चारात श्रीमद्भगवद्गीता म्हणतात. ती संपूर्ण गीता त्यांना मुखोद्गत आहे. ताला-सुरात ते जेव्हा गीता म्हणतात, तेव्हा मंदिराचा सारा परिसर पवित्र होऊन जातो.गोरख वाघ कधी काय करतील याचा नेम नाही. कधी काळी व्यसनातही ते बुडाले, त्यातून ते पुन्हा सावरले. हाही त्यांच्या स्वभावाचाच एक भाग आहे. गावात कोणाच्याही घरात सुखाचा प्रसंग असो वा दुःखाचा, ते धावून जाणार. लग्नकार्य असो, संकट असो, ते आपणहून हजर राहणार.आज त्यांचं वय झालं आहे, पण डोळ्यातलं तेज, मनातला उत्साह आजही तसाच आहे. कधी कधी गावाला त्यांच्या उपद्व्यापाचा त्रासही होतो, मात्र गावाला आता त्याची सवय झाली आहे. अशी माणसं आहेत म्हणून गावाला गावपण आहे.एक गोष्ट मात्र त्यांच्याविषयी जाणवते, त्यांनी आपल्या बुद्धिमत्तेचा वापर जर स्थिर राहून योग्य केला असता तर ते आणखी खूप प्रगती करू शकले असते. एक व्यक्ती म्हणून ते मोठेच आहेत, परंतु त्यांच्यातील वल्ली त्यांना स्वस्थ व शांत बसू देत नाही. आज ते चांगलेच स्थिरावले आहेत, देवदेव करू लागले आहेत. मात्र त्यांचा जीवनप्रवास त्यांना कुठे घेऊन जाईल हे त्यांनाही माहित नाही. एक गोष्ट मात्र नक्की, गोरख वाघ हे व्यक्तिमत्त्व सर्वांच्याच कायम लक्षात राहील. गावाकडे गेलो की त्यांची आठवण येतेच...

डॉ. शिवाजी हुसे('सुखनाकाठची माणसं' या लेखमालेतील लेख)

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६

भाडखाऊ आता झाडखाऊ झाले

अक्कलवान माणूस आता
बेअक्कली झाला आहे
लालचेपुढे त्याने
अक्कल गहाण ठेवली आहे

डोळ्याला त्याच्या काचबिंदू झाला आहे
बरं-वाईट काही दिसेनासे झाले आहे
भाडखाऊ होता-होता आता
झाडखाऊ झाला आहे

प्राण्यांचे घरं छाटून
बेघर त्यांना करतो आहे
नद्या बापाचा माल समजून
नाले करतो आहे

निसर्गाला छेडतो आहे
मनमानी करतो आहे
भाडखाऊ माणूस आता
झाडखाऊ झाला आहे

कित्येक झाडांच्या कत्तली केल्या
बेअक्कली माणसाने
झाडे लावू सांगतो अन्
झूडपं लावतो आहे

झाडं वाढवणं त्याला
भ्रष्टाचार केल्यासारखं वाटत आहे
ज्याने त्याला अक्कल दिली
त्याहून शहाणा होऊ पाहतो आहे

झाड वाढवणं म्हणजे
वेश्यांच्या पोटी पित्तू दिल्यासारखं नसतं
स्वतःच्या लेकरासारखं सांभाळावं लागतं
स्वतःहा मायबाप होऊन त्याचं
पालनपोषण करावं लागतं

कुंडीत झुडपं वाढवणं
म्हणजे झाडं लावणं
अशी समज झाली
बेअकली माणसांची

जंगलात झाड लावून
वाढवणं दूरच राहिलं
घरासमोर एखादं झाड लावून
त्याला वाढवून पाहा म्हणावं

आता ते दिवस गेले
नुसतं बी टाकून द्यायचं अन्
झाड वाढेल म्हणायचं

दरवर्षी तोच खड्डा
झाड नवीन लावायचं
कलम खुपसून झाडाची
जाहिरातबाजी करायची

झाड वाढेल म्हणत पुन्हा
ढुंकून पाहायचं नाही
मेलं तर मेलं
शोक करायचा नाही

अरे मॉर्डन माणसा
तू लावलेली झुडपंही
कुपोषित राहिली आहे
झाड जरी लावलं तू
त्याचं वृक्ष कधी होणारं
लावलेलं रोपटं
तिसऱ्या दिवशीच मरुन जाणार

झाडं वाढवणं म्हणजे
भेगाळलेल्या जमिनीत पाणी शोधणं आहे
कसं वाढणार बी त्यात
रानं तूच भोंगळं केलं आहे
माती वाहून गेली, खडक उरले आहे

स्वतःच्या स्वार्थासाठी
इतरांना भोगणारे भोगी तुम्ही कापा
स्वतःच्या स्वार्थासाठी इतरांचे बळी घेणारे
स्वार्थी बंडखोर तुम्ही कापा

कधी न मोबदला मागणारी
निस्वार्थी, निष्पापी झाडे तुम्ही तोडू नका
निसर्ग जतवतोय वेळोवेळी
अक्कल थोडी येऊ द्या

अरे लालची माणसा
स्वतःचा मूत स्वतः प्यावा लागेल
अशी वेळ स्वतःवर ओढून आणू नको

झाडे तोडू नको
नद्या, नाले करू नको
निसर्गाला भोगवस्तू समजून
तू त्यावर वर्चस्व गाजवू नको

झाडे वाढवा
नद्या वाचवा
निसर्ग जपा
तरच माणसा तुझं
अस्तित्व टिकणार आहे

क्षणभर श्वास नसेल
कणभर अन्न नसेल
घोटभर पाणी नसेल
झाडाविना माणसा
तुझं जगणं
कुत्र्यापलीकडे होणार आहे
जन्म तर सोड
तुझं मरणही अवघड होणार आहे

- लक्ष्मण वाल्डे
मो. 88886 06068

महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ ५ वा पदवीप्रदान समारंभ १ नोव्हेंबरला १७१ विद्यार्थ्यांना मिळणार पदव्या

दौलताबाद (जावेद अहमद) : महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ (MNLU), छत्रपती संभाजीनगरचा पाचवा पदवीप्रदान समारंभ (Convocation Programme) येत्या १ नोव्हेंबर २०२६ (रविवार) रोजी आयोजित करण्यात आला आहे. विद्यापीठाच्या कांचनवाडी येथील अधिकृत परिसरात सकाळी १०:३० वाजता हा सोहळा पार पडणार असल्याची माहिती विद्यापीठाचे उप-कुलसचिव डॉ. निवृत्ती एम. गजबारे यांनी दिली आहे.या महत्त्वपूर्ण सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती एम. एम. सुंदरेश उपस्थित राहणार आहेत. तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सर्वोच्च न्यायालयाचे माननीय न्यायमूर्ती तथा विधी विद्यापीठाचे कुलपती माननीय प्रसन्न बी. वराळे भूषवणार आहेत.या वर्षी विविध विधी अभ्यासक्रमांतील एकूण १७१ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान केली जाणार आहे. यामध्ये बी.ए. एलएल.बी. (ऑनर्स) चे ४५ विद्यार्थी,बी.बी.ए. एलएल.बी. (ऑनर्स) चे ३ विद्यार्थी,एलएल.एम. चे १२४ विद्यार्थी आणिपी.एच.डी. पदवी प्राप्त १ संशोधक विद्यार्थ्याचा समावेश आहे.या समारंभाला मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती तथा विद्यापीठाचे प्र-कुलपती माननीय महेश चंद्र त्रिपाठी, कलकत्ता उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती माननीय रविंद्र व्ही. घुगे आणि मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती माननीय संतोष जी. चपळगावकर हे सन्माननीय अतिथी म्हणून व्यासपीठावर उपस्थित राहतील. तसेच विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा.डॉ.बिंदू रोनॉल्ड, कुलसचिव प्रा.डॉ.धनाजी एम. जाधव आणि सर्व प्राध्यापक वर्ग उपस्थित राहणार आहे.या दिमाखदार सोहळ्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर खंडपीठातील न्यायमूर्ती, वकील मंडळी, प्रतिष्ठित नागरिक, पदवीधारक विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

जिंतूर तालुक्यातील मुडा येथील महिला बचत गटांच्या कर्जवसुलीचा तगादा थांबवा

जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : जिंतूर तालुक्यात यंदा दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांच्या शेतात पीक नाही, तर शेतमजुरांच्या हाताला काम नाही. अशा कठीण परिस्थितीत ग्रामीण भागातील महिला बचत गटांच्या कर्जवसुलीसाठी मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून सक्ती केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या वसुलीच्या तगाद्यामुळे जिंतूर तालुक्यातील मौजे मुडा येथील महिलांना मानसिक त्रास सहन करावा लागत असून, ही सक्ती तात्काळ थांबवावी, अशी मागणी दारिद्र्य निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आली आहे.यासंदर्भात ३० ऑक्टोबर रोजी जिंतूर तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, भारत फायनान्स, मायक्रो फायनान्स कंपन्या, सरकारी व खासगी बँका तसेच खासगी सावकारांकडून महिला बचत गटांना कर्जपुरवठा करण्यात आला आहे. मात्र, सध्या आर्थिक परिस्थिती बिकट असतानाही संबंधित कंपन्यांचे वसुली प्रतिनिधी महिलांच्या घरी जाऊन अपमानास्पद वागणूक देत असून, धमकावणे आणि मानसिक दबाव आणण्याचे प्रकार सुरू आहेत.महिलांना सन्मानाने जगण्याचा अधिकार असताना कर्जवसुलीच्या नावाखाली त्यांचा अपमान केला जात असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.निवेदनातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे :१. महिला बचत गटांकडील कर्जाच्या सक्तीच्या वसुलीला तात्काळ स्थगिती द्यावी.२. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर एक वर्षासाठी कोणत्याही लाभार्थ्यांचा सिबिल (CIBIL) स्कोअर खराब करू नये.३. मायक्रो फायनान्स कंपन्यांच्या वसुली प्रतिनिधींनी गावोगावी जाऊन महिलांना त्रास देणे व दमदाटी करणे थांबवावे. असे प्रकार करणाऱ्यांवर नियमा नुसार कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे या निवेदनावर गंगाधर नागोराव नामकर दारिद्र्य निर्मूलन समिती महाराष्ट्र राज्य व शरद सुदामराव चव्हाण सामाजिक कार्यकर्ता जिंतूर तसेच महिला कार्यकर्ता छायाबाई हरिभाऊ सरकटे, मिरा मिलिंद खिल्लारे, राधा संतोष कसबे, विशाखा भिमराव सरकटे, यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६

डॉ. मधुकरराव वासनिक कला,वाणिज्य, व विज्ञान महाविद्यालय विद्यार्थ्यांची मानव विज्ञान संग्रहालयाला शैक्षणिक भेट

नागपूर (चंद्रशेखर पाटील) : डॉ. मधुकरराव वासनिक पीडब्ल्यूएस कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, कामठी रोड नागपूर येथील समाज विज्ञान शाखा अंतर्गत (समाजशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र आणि डॉ. आंबेडकर विचारधारा विभागांच्या संयुक्त विद्यमाने २९ ऑक्टोबर २०२६ रोजी मध्य भारतातील नागपूर येथील सेमिनरी हिल्स परिसरातील मानव विज्ञान संग्रहालयाला शैक्षणिक भेट देण्यात आली. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अनुभवधारित शिक्षणाला प्रोत्साहन देणे, विद्यार्थ्यांमध्ये आंतरशाखीय दृष्टिकोन विकसित करणे तसेच प्रत्यक्ष निरीक्षणातून ज्ञान संपादन करण्याची संधी उपलब्ध करून देणे .हा या शैक्षणिक भेटीचा प्रमुख उद्देश होता.मानव विज्ञान संग्रहालय हे मानवी उत्क्रांती, भारतीय संस्कृती, आदिवासी समाजजीवन आणि सांस्कृतिक विविधतेचा अभ्यास करण्यासाठी महत्त्वाचे केंद्र आहे. या संग्रहालयाचे कार्यक्षेत्र मध्य भारतातील महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गोवा आणि छत्तीसगड या राज्यांतील आदिवासी समाजांच्या अभ्यासाशी संबंधित आहे. या राज्यांतील आदिवासी समुदायांची संस्कृती, परंपरा, जीवनशैली, सामाजिक रचना आणि स्वदेशी ज्ञानपद्धती यांचे संकलन, जतन, संशोधन व दस्तऐवजीकरण करण्याच्या दृष्टीने संग्रहालय महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. संग्रहालयातील विविध वस्तू, प्रदर्शने आणि माहितीपटांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मानवी समाजाच्या सामाजिक व सांस्कृतिक विकासाची माहिती मिळाली.या भेटीदरम्यान संग्रहालयाचे प्रमुख व मानववंशशास्त्रज्ञ डॉ. विश्वजित महापात्रा तसेच संशोध कफेलो आशिफ, बोनिस, सिद्धार्थ, सर तानिया , दीपा ,व निता मॅडम, आणि एरिका मॅडम यांनी विद्यार्थ्यांना संग्रहालयातील विविध दालने आणि प्रदर्शनांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी मानवी उत्क्रांतीचे विविध टप्पे, मानवाच्या सामाजिक व सांस्कृतिक विकासाची प्रक्रिया, आदिवासी समाजाचे जीवनमान आणि भारतीय समाजातील सांस्कृतिक विविधता या विषयांवर मार्गदर्शन केले.या शैक्षणिक भेटीचे प्रमुख आकर्षण म्हणजे छत्तीसगड आणि मध्य प्रदेशातील गोंड भुरिया व बैगा आदिवासी समुदायांच्या जीवनशैलीवर आधारित लघुपटाचे सादरीकरण हे होते. या लघुपटातून आदिवासी समाजाचे सामाजिक व सांस्कृतिक जीवन, पारंपरिक प्रथा, सण-उत्सव, नृत्यकला, रूढी-परंपरा आणि स्वदेशी ज्ञानपद्धती यांचे दर्शन विद्यार्थ्यांना घडले. आदिवासी समुदायांचे निसर्गाशी असलेले नाते, त्यांची पारंपरिक जीवनशैली आणि सांस्कृतिक वैशिष्ट्ये समजून घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाली.या शैक्षणिक भेटीमुळे विद्यार्थ्यांना मानवी उत्क्रांती, सांस्कृतिक विविधता, आदिवासी समाजजीवन आणि स्वदेशी ज्ञानप्रणाली यांविषयी सखोल माहिती प्राप्त झाली. समाजशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयांच्या अभ्यासाशी संबंधित अनेक संकल्पना प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेण्यास मदत झाली. वर्गामध्ये शिकविल्या जाणाऱ्या सैद्धांतिक ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनातील सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तवाशी संबंध जोडण्याच्या दृष्टीने प्रकल्प भेट अत्यंत उपयुक्त ठरली.या क्षेत्रीय अभ्यासभेटीचे नेतृत्व समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. कमला तागडे इतिहास विभागप्रमुख डॉ. चंद्रशेखर पाटील, महेंद्र गायकवाड (आबेडकर विचारधारा विभाग) राज्यशास्त्र विभागाचे डॉ. सुशांत चिमणकर ,अर्थशास्त्र विभागाचे डॉ. लखन सर , डॉ. मानसी पनपलिया, डॉ. सना कौसर आणि गायत्री मॅडम इत्यादि प्राध्यापक सहभागी झाले होते. या शैक्षणिक भेटीत महाविद्यालयातील विविध विभागांचे एकूण ४० विद्यार्थी सहभागी झाले होते.

सरोश मराठी प्रा. शाळेत "मुले रंगली काव्यात" कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : पडेगाव येथील सरोश (मराठी माध्यम) प्राथमिक शाळेत नुकताच विद्यार्थ्यांचे अभ्यासातील ताण-तणाव कमी करण्यासाठी सुप्रसिद्ध कवी अय्युब पठाण लोहगावकर यांनी खास विद्यार्थ्यांसाठी असलेला त्यांचा एक पात्री कार्यक्रम " मुले रंगली काव्यात " हा एकपात्री विनोदी कार्यक्रम सादर करून विद्यार्थ्यांना भरपूर हसविले आहे. आणि विद्यार्थ्यांच्या मनातील अभ्यासाबद्दलचा ताण तणाव कमी केला आहे. यामध्ये देशभक्तीपर गीते, साक्षरता गीते, भारुडे,पोवाडे, पाळणे उखाने,विनोदी नकला, व विनोदी कविता सादर करून विद्यार्थ्यांचे मनसोक्त मनोरंजन केले आहे. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक इरफान शेखसर शिक्षक युनुस शेख सर तसेच इतर शिक्षक- शिक्षिकाही हा सांस्कृतिक कार्यक्रम पाहण्यात मग्न झाले होते. यावेळी परिसरातील पालकवर्ग आणि सरोश प्रा.शाळेतील विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जीवन जगत असतांना

माणसं कळायला जगात,
लागत असते भरपूर वेळ.
जीवन जगत असताना,
वास्तवाशी बसवावे मेळ. १

जगतांना वागतांना खरंच,
माणसं भेटतात विचित्र.
जवळून अनुभवल्यावर,
ओळखून येतात सचित्र. २

जगण्यात वागण्यात,
मात्र अंतर असते खूप.
काम करताना दिसते,
अंतर्मनातील खरे रूप. ३

म्हणतात माणसासाठी,
माणसाने पेटवावी वाती.
टिकवून ठेवावे सदैव,
दोन मनामनातील नाती. ४

वास्तवात जगताना मात्र,
माणूस माणसास छळतो.
प्रत्यक्षात वागतांना तोच,
सत्यापासून दूरदूर पळतो. ५

बोलण्यासारखे वागणे,
असते खूपच अवघड.
खरे बोलणाऱ्याची होते,
कायम जगतांना परवड. ६

नागेश बोंतेवाड,
मो.नं. ९७६३२८३८०४

मातोश्री नगरच्या भूखंड नामांतराला नगर परिषदेची तूर्तास स्थगिती

जिंतूर (बी. डी. रामपूरकर) : शहरातील मातोश्री नगर येथील गट क्रमांक १६१/अ मधील भूखंडांच्या नामांतर प्रक्रियेला जिंतूर नगर परिषदेने तूर्तास स्थगिती दिली आहे. मंजूर अभिन्यासानुसार आवश्यक विकासकामे पूर्ण न करणे, रस्ते व खुल्या जागांचे नगर परिषदेकडे हस्तांतरण न करणे, तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता नसल्याने भूखंडांच्या नामांतराची नोंद घेऊ नये, असे स्पष्ट निर्देश नगर परिषदेने दिले आहेत.या प्रकरणी नगरसेविका प्रीती प्रदीप चौधरी यांनी १४ ऑक्टोबर २०२६ रोजी नगर परिषदेकडे लेखी तक्रार दाखल केली होती. मातोश्री नगरमधील गट क्रमांक १६१/अ येथील भूखंडांच्या अभिन्यासातील विकासकामे आणि सार्वजनिक वापरासाठी राखीव जागांच्या हस्तांतरणाबाबत त्यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या तक्रारीच्या पार्श्वभूमीवर नगर परिषदेने संबंधित जमीन मालक आणि वास्तुविशारदांना २८ ऑक्टोबर रोजी लेखी पत्र देत आपली भूमिका स्पष्ट केली आहे.संबंधित गटातील एकूण १९ हजार ९०० चौरस मीटर क्षेत्रात भूखंड क्रमांक १ ते ९५ आहेत. मंजूर अभिन्यासानुसार आवश्यक रस्ते, नाल्या व इतर मूलभूत विकासकामे पूर्ण झालेली नसल्याचे तसेच रस्ते आणि खुल्या जागांच्या हस्तांतरणासाठी नियमानुसार आवश्यक खरेदीखत करून त्याची प्रत नगर परिषदेकडे सादर केलेली नसल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.विशेष म्हणजे, यापूर्वीही नगर परिषदेकडून आवश्यक पूर्ततेबाबत कळविण्यात आले होते. मात्र, त्यानंतरही विकासकामे आणि हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झालेली नसल्याने संबंधित गटातील भूखंडांच्या नामांतराची नोंद घेण्यात येणार नाही, असे नगर परिषदेने नामांतर विभागाला स्पष्ट केले आहे.नगरसेविका चौधरी यांच्या तक्रारीनंतर प्रशासनाने घेतलेल्या या भूमिकेमुळे मातोश्री नगरमधील भूखंडांच्या नामांतराचा विषय चर्चेत आला आहे. विकासकामे पूर्ण करून सार्वजनिक जागा नगर परिषदेकडे हस्तांतरित केल्याशिवाय नामांतराला हिरवा कंदील मिळणार नसल्याचे या पत्रावरून स्पष्ट होत आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६

राष्ट्रीय एकता : विविधतेतील एकात्मतेचा संकल्प - डॉ. राजेंद्र बगाटे

भारत हा विविधतेने नटलेला, सांस्कृतिक समृद्धीचा प्रदीर्घ वारसा लाभलेला आणि लोकशाही मूल्यांवर आधारित राष्ट्र आहे. या देशाची खरी ओळख केवळ त्याच्या भौगोलिक विस्तारात किंवा लोकसंख्येत नाही, तर विविध भाषा, धर्म, जाती, पंथ, संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धती यांना सामावून घेणाऱ्या सामाजिक रचनेत आहे. हिमालयाच्या उत्तुंग पर्वतरांगांपासून कन्याकुमारीच्या समुद्रकिनाऱ्यापर्यंत आणि राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशापासून ईशान्य भारतातील हिरव्यागार डोंगराळ भागांपर्यंत प्रत्येक प्रदेशाचे स्वतंत्र भौगोलिक, सांस्कृतिक आणि सामाजिक वैशिष्ट्य आहे. प्रत्येक राज्याची भाषा, लोककला, खाद्यसंस्कृती, वेशभूषा आणि सण-उत्सव वेगवेगळे असले, तरी या सर्वांना जोडणारा समान धागा म्हणजे भारतीयत्व. विविधतेचा स्वीकार करून परस्परांविषयी आदर, विश्वास, सहकार्य आणि बंधुभाव निर्माण करणे म्हणजे राष्ट्रीय एकता होय. राष्ट्रीय एकता ही केवळ भावनिक संकल्पना नसून देशाच्या सामाजिक स्थैर्याचा, लोकशाहीच्या बळकटीकरणाचा आणि सर्वांगीण विकासाचा मूलभूत आधार आहे.दरवर्षी ३१ ऑक्टोबर हा दिवस भारतात राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरा केला जातो. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी पाळला जातो. स्वातंत्र्यानंतर भारताच्या एकीकरणामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. तथापि, या दिवसाचे महत्त्व केवळ एका ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाच्या कार्याचे स्मरण करण्यापुरते मर्यादित नाही. आजच्या बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीत देशाची एकता टिकविणे, सामाजिक सलोखा वाढविणे आणि नागरिकांमध्ये राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव निर्माण करणे ही या दिवसाची व्यापक उद्दिष्टे आहेत. देशाची अखंडता टिकविण्यासाठी केवळ भौगोलिक सीमा सुरक्षित असणे पुरेसे नाही, तर देशातील नागरिकांची मने एकमेकांशी जोडलेली असणेही तितकेच आवश्यक आहे. म्हणूनच राष्ट्रीय एकता दिन हा प्रत्येक भारतीयाला आपल्या सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे.राष्ट्रीय एकता म्हणजे सर्वांनी एकाच भाषेत बोलणे, एकाच धर्माचे पालन करणे किंवा एकसारखी जीवनशैली स्वीकारणे नव्हे. प्रत्येक व्यक्तीला आपली भाषा, धर्म, संस्कृती, परंपरा आणि विचार जपण्याचे स्वातंत्र्य असतानाही इतरांच्या वेगळेपणाचा आदर करून देशाच्या व्यापक हितासाठी एकत्र येणे म्हणजे राष्ट्रीय एकता. विविधतेचा नाश करून एकरूपता निर्माण करणे हा एकतेचा मार्ग नाही. उलट, विविधतेचे जतन करून समान राष्ट्रीय भावना विकसित करणे हा खऱ्या एकात्मतेचा आधार आहे. भारतीय समाजातील प्रत्येक घटकाचे स्वतंत्र अस्तित्व आणि योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे कोणत्याही भाषा, धर्म, जात किंवा प्रदेशाला श्रेष्ठ अथवा कनिष्ठ मानण्याची प्रवृत्ती टाळली पाहिजे. प्रत्येक नागरिकाला भारतीय म्हणून समान सन्मान मिळणे आणि देशाच्या विकासात सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. विविधतेचा आदर आणि समानतेचा आग्रह या दोन्ही गोष्टी एकत्र आल्या, तरच राष्ट्रीय एकतेची संकल्पना प्रत्यक्षात साकार होऊ शकते.भारतीय स्वातंत्र्यलढा हा राष्ट्रीय एकतेच्या सामर्थ्याचे प्रभावी उदाहरण आहे. देशाच्या विविध भागांतील लोकांनी स्वातंत्र्याच्या समान ध्येयासाठी आपापले प्रादेशिक, भाषिक, धार्मिक आणि सामाजिक भेद बाजूला ठेवून संघर्ष केला. शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला, आदिवासी, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक यांनी या चळवळीत सहभाग घेतला. वेगवेगळ्या भाषा बोलणारे, वेगवेगळ्या धर्मांचे आणि सामाजिक पार्श्वभूमीचे लोक एका राष्ट्रीय उद्दिष्टासाठी एकत्र आले. या सामूहिक सहभागामुळे स्वातंत्र्याची चळवळ व्यापक झाली. या इतिहासातून एक महत्त्वाचा संदेश मिळतो की समाजातील विविध घटकांमध्ये परस्परविश्वास आणि सहकार्याची भावना निर्माण झाली, तर मोठी राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करणे शक्य होते. स्वातंत्र्यानंतरही देशाच्या विकासासाठी, लोकशाहीच्या संरक्षणासाठी आणि सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी याच एकजुटीची आवश्यकता आहे.भारतीय संविधान हे राष्ट्रीय एकतेचे सर्वांत महत्त्वाचे अधिष्ठान आहे. संविधानाच्या उद्देशिकेत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा समावेश करण्यात आला आहे. ही मूल्ये केवळ कायदेशीर तरतुदी नसून भारतीय समाजाला एकत्र बांधणारी जीवनमूल्ये आहेत. प्रत्येक नागरिकाला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळावा, विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य लाभावे, संधींची समानता उपलब्ध व्हावी आणि व्यक्तीची प्रतिष्ठा जपत बंधुभाव वाढावा, हा संविधानाचा व्यापक दृष्टिकोन आहे. संविधानाने सर्व नागरिकांना समान नागरिकत्व दिले आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीचे स्थान तिच्या जातीवर, धर्मावर, भाषेवर, लिंगावर किंवा जन्मस्थानावरून ठरत नाही. प्रत्येक नागरिक हा राष्ट्राचा समान घटक आहे, ही जाणीव राष्ट्रीय एकतेला बळ देते. संविधानातील मूल्यांचे पालन करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.भारतीय समाजात आजही जातिभेद आणि सामाजिक विषमता ही राष्ट्रीय एकतेसमोरील गंभीर आव्हाने आहेत. जातीच्या आधारावर माणसामाणसांत भेदभाव करणे, सामाजिक प्रतिष्ठा नाकारणे, सार्वजनिक ठिकाणी समान वागणूक न देणे किंवा विशिष्ट समाजघटकांना विकासाच्या संधींपासून वंचित ठेवणे या प्रवृत्ती समाजात दुरावा निर्माण करतात. सामाजिक एकता टिकविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला समान सन्मान आणि समान संधी मिळणे आवश्यक आहे. अस्पृश्यता, जातीय अहंकार, सामाजिक बहिष्कार आणि भेदभाव यांना आधुनिक लोकशाही समाजात स्थान असू शकत नाही. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांनी सामाजिक विषमतेविरुद्ध संघर्ष करून समताधिष्ठित समाजनिर्मितीचा विचार मांडला. त्यांच्या विचारांचा स्वीकार करणे म्हणजे सामाजिक बंधुभाव आणि राष्ट्रीय एकता अधिक दृढ करणे होय. समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगता येईल, अशी परिस्थिती निर्माण झाली तरच एकात्मतेची भावना वास्तवात उतरू शकते.धार्मिक विविधता हे भारताच्या सामाजिक जीवनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. हिंदू, बौद्ध, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, जैन, पारशी आणि इतर धार्मिक समुदायांचे लोक या देशात एकत्र राहतात. प्रत्येक धर्माची स्वतंत्र श्रद्धा, उपासना पद्धती, सण, उत्सव आणि सांस्कृतिक परंपरा आहेत. या विविधतेमुळे भारतीय समाजाचे सांस्कृतिक जीवन समृद्ध झाले आहे. मात्र धर्माच्या नावावर द्वेष निर्माण करणे, अफवा पसरविणे, धार्मिक भावना भडकविणे किंवा एका समुदायाला दुसऱ्या समुदायाच्या विरोधात उभे करणे या गोष्टी राष्ट्रीय एकतेस बाधा आणतात. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे आणि त्याच वेळी इतरांच्या श्रद्धांचा आदर करण्याची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे. धार्मिक सहिष्णुता म्हणजे केवळ दुसऱ्याच्या श्रद्धेला सहन करणे नव्हे, तर त्याच्या अस्तित्वाचा आणि अधिकारांचा सन्मान करणे होय. विविध धार्मिक समुदायांतील नागरिकांनी परस्परांच्या सण-उत्सवांत सहभागी होणे, सामाजिक कार्यात सहकार्य करणे आणि संकटाच्या वेळी एकमेकांच्या मदतीला धावून जाणे यातून राष्ट्रीय एकतेची भावना अधिक दृढ होते.भाषिक विविधता ही भारतीय समाजाची आणखी एक महत्त्वाची ओळख आहे. भारतात अनेक भाषा आणि बोलीभाषा बोलल्या जातात. प्रत्येक भाषेला स्वतःचा इतिहास, साहित्यिक परंपरा, लोकसाहित्य आणि सांस्कृतिक वारसा आहे. मातृभाषा ही व्यक्तीच्या भावविश्वाशी आणि सांस्कृतिक ओळखीशी जोडलेली असते. त्यामुळे प्रत्येक भाषेचा सन्मान राखणे आवश्यक आहे. एखाद्या भाषेला श्रेष्ठ आणि दुसऱ्या भाषेला कनिष्ठ मानण्याची प्रवृत्ती भाषिक दुरावा निर्माण करू शकते. राष्ट्रीय एकतेसाठी भाषिक विविधतेचा स्वीकार आणि परस्परांच्या भाषांविषयी आदर आवश्यक आहे. विविध भारतीय भाषा शिकण्याची संधी उपलब्ध करून दिल्यास वेगवेगळ्या प्रदेशांतील नागरिकांमधील संवाद वाढू शकतो. साहित्य, नाटक, चित्रपट, लोककला आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांच्या माध्यमातून भाषिक बंध अधिक दृढ करता येतात. स्वतःच्या मातृभाषेचा अभिमान बाळगताना इतर भाषांचाही सन्मान करणे ही राष्ट्रीय एकात्मतेची महत्त्वाची खूण आहे.प्रादेशिक विविधतेचाही राष्ट्रीय एकतेशी जवळचा संबंध आहे. भारतातील प्रत्येक राज्याची भौगोलिक परिस्थिती, आर्थिक रचना, लोकजीवन आणि सांस्कृतिक परंपरा वेगवेगळ्या आहेत. महाराष्ट्राची संतपरंपरा, सामाजिक सुधारणांचा वारसा, सहकार चळवळ आणि लोककला यांना विशेष महत्त्व आहे. पंजाबची शौर्यपरंपरा, बंगालचे साहित्यिक योगदान, दक्षिण भारताची प्राचीन सांस्कृतिक परंपरा, ईशान्य भारतातील आदिवासी संस्कृती आणि राजस्थानची लोकपरंपरा अशा अनेक वैशिष्ट्यांनी भारतीय समाज समृद्ध झाला आहे. या प्रादेशिक वैशिष्ट्यांचा आदर राखून राष्ट्रीय स्तरावर परस्पर सहकार्य वाढविणे आवश्यक आहे. एका राज्यातील नागरिकांनी दुसऱ्या राज्यातील लोकांकडे परकेपणाने पाहण्याऐवजी त्यांना समान राष्ट्रीय समुदायाचे घटक म्हणून स्वीकारले पाहिजे. शिक्षण, रोजगार किंवा व्यवसायानिमित्त दुसऱ्या राज्यात स्थलांतरित झालेल्या नागरिकांना सन्मानाने वागविणे ही राष्ट्रीय एकतेची प्रत्यक्ष कसोटी आहे.राष्ट्रीय एकतेच्या प्रक्रियेत आदिवासी आणि दुर्गम भागांतील समाजघटकांचा सहभाग विशेष महत्त्वाचा आहे. आदिवासी समुदायांची भाषा, संस्कृती, लोकपरंपरा, पर्यावरणविषयक ज्ञान आणि जीवनपद्धती भारतीय सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहेत. वारली, भिल्ल, कोकणा, गोंड, संथाल आणि इतर अनेक आदिवासी समुदायांनी देशाच्या सांस्कृतिक समृद्धीत मोलाचे योगदान दिले आहे. मात्र अनेक आदिवासी भागांत शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेबाबत आजही अडचणी आहेत. विकासाच्या प्रक्रियेत त्यांना समान संधी मिळणे, त्यांच्या जमिनी, भाषा, संस्कृती आणि परंपरांचे संरक्षण होणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाला विकासाच्या प्रवाहात सहभागी करून घेताना त्यांच्या स्वतंत्र सांस्कृतिक ओळखीचा आदर केला पाहिजे. विकासाच्या संधींपासून कोणताही समाजघटक वंचित राहिल्यास राष्ट्रीय एकतेची भावना कमकुवत होऊ शकते. म्हणूनच समावेशक विकास हा राष्ट्रीय एकात्मतेचा महत्त्वाचा आधार आहे.आर्थिक विषमता ही राष्ट्रीय एकतेसमोरील आणखी एक मोठी समस्या आहे. देशाच्या विकासाचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत समानतेने पोहोचला नाही, तर सामाजिक असंतोष आणि दुरावा वाढण्याची शक्यता असते. ग्रामीण आणि शहरी भागांतील विकासातील अंतर, शेतकरी आणि शेतमजुरांच्या समस्या, बेरोजगारी, गरिबी, शिक्षणातील असमानता आणि आरोग्यसेवांची अपुरी उपलब्धता यांचा समाजाच्या एकात्मतेवर परिणाम होतो. एका बाजूला आधुनिक तंत्रज्ञान आणि औद्योगिक विकास झपाट्याने होत असताना दुसऱ्या बाजूला अनेक नागरिकांना मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागतो. त्यामुळे आर्थिक विकासाचे उद्दिष्ट केवळ राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यापुरते मर्यादित न ठेवता सर्वसामान्यांच्या जीवनमानात सुधारणा घडविणे हे असले पाहिजे. रोजगारनिर्मिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण, परवडणाऱ्या आरोग्यसेवा, ग्रामीण विकास आणि सामाजिक सुरक्षा यांना प्राधान्य दिल्यास समाजातील विविध घटकांमध्ये विश्वास निर्माण होईल.महिलांचा सन्मान, सुरक्षितता आणि समान सहभाग यांशिवाय राष्ट्रीय एकतेची संकल्पना पूर्ण होऊ शकत नाही. देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासात महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. तरीही लिंगभेद, कौटुंबिक हिंसा, बालविवाह, शिक्षणातील अडथळे, रोजगारातील असमानता आणि सार्वजनिक जीवनातील असुरक्षितता यांसारख्या समस्या अस्तित्वात आहेत. महिलांना समान संधी, निर्णयप्रक्रियेत सहभाग, आर्थिक स्वावलंबन आणि प्रतिष्ठेचे जीवन मिळणे आवश्यक आहे. स्त्री-पुरुष समानतेचा विचार घरापासून शाळेपर्यंत आणि कार्यस्थळापासून सार्वजनिक संस्थांपर्यंत रुजला पाहिजे. समाजातील निम्म्या लोकसंख्येला समान अधिकार आणि संधी नाकारून राष्ट्रीय प्रगती साधता येणार नाही. महिलांच्या नेतृत्वाला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या क्षमतांचा विकास करणे ही राष्ट्रीय एकतेचीही गरज आहे.राष्ट्रीय एकतेच्या जडणघडणीत शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षण केवळ ज्ञान आणि कौशल्ये देत नाही, तर व्यक्तीच्या विचारांना व्यापकता आणि सामाजिक जाणीवही प्रदान करते. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये संविधानिक मूल्ये, सामाजिक समता, लोकशाही, मानवी हक्क, पर्यावरणीय जबाबदारी आणि विविधतेचा आदर यांविषयी विद्यार्थ्यांना समज दिली पाहिजे. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या धर्मांचे, भाषा बोलणाऱ्या आणि विविध सामाजिक पार्श्वभूमीतील सहाध्यायांशी संवाद साधावा, एकत्रित उपक्रमांत सहभागी व्हावे आणि परस्परांच्या अनुभवांचा आदर करावा. राष्ट्रीय सण, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक सेवा आणि युवक उपक्रम यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामूहिक जबाबदारीची भावना विकसित करता येते. शिक्षणातून विवेकशील, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडले, तर राष्ट्रीय एकतेचा पाया अधिक मजबूत होईल.आजच्या डिजिटल युगात समाजमाध्यमे राष्ट्रीय एकतेसाठी संधी आणि आव्हान अशा दोन्ही भूमिका बजावत आहेत. माहिती आणि विचारांची देवाणघेवाण काही क्षणांत देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचू शकते. विविध प्रदेशांतील लोकांना एकमेकांच्या संस्कृतीची ओळख करून देणे, सामाजिक प्रश्नांवर चर्चा घडविणे आणि लोकहिताच्या उपक्रमांना पाठिंबा मिळविणे यासाठी डिजिटल माध्यमे उपयुक्त ठरतात. परंतु खोटी माहिती, बनावट छायाचित्रे, दिशाभूल करणारे संदेश, द्वेषपूर्ण भाष्य आणि अफवा यांमुळे समाजात अविश्वास निर्माण होऊ शकतो. विशेषतः धर्म, जात आणि प्रादेशिक ओळख यांच्याशी संबंधित अप्रमाणित माहिती वेगाने पसरल्यास सामाजिक शांततेला धोका निर्माण होतो. त्यामुळे कोणतीही माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, विवेकाने प्रतिक्रिया देणे आणि द्वेष पसरविणाऱ्या मजकुरापासून दूर राहणे प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. डिजिटल साक्षरतेबरोबरच माध्यम साक्षरता विकसित करणे ही आजच्या काळातील राष्ट्रीय एकतेची आवश्यक अट आहे.राष्ट्रीय एकता आणि राष्ट्रीय सुरक्षा यांचाही परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे. देशाच्या सीमांचे संरक्षण करण्यासाठी सक्षम संरक्षण व्यवस्था आवश्यक असते; मात्र देशांतर्गत सामाजिक शांतता, नागरिकांमधील विश्वास आणि लोकशाही संस्थांवरील श्रद्धाही तितकीच महत्त्वाची असते. दहशतवाद, फुटीरतावादी प्रवृत्ती, हिंसाचार आणि बाह्य हस्तक्षेप यांसारख्या आव्हानांचा सामना करताना समाजातील एकजूट महत्त्वाची ठरते. नैसर्गिक आपत्ती, महामारी किंवा इतर आणीबाणीच्या परिस्थितीत नागरिकांनी परस्परांना मदत करणे ही राष्ट्रीय एकतेची जिवंत अभिव्यक्ती आहे. पूर, भूकंप, दुष्काळ किंवा इतर संकटांमध्ये मदतीसाठी पुढे येणारे स्वयंसेवक, सामाजिक संस्था, प्रशासन आणि सामान्य नागरिक हे एकात्मतेचे सामर्थ्य दाखवून देतात. संकटाच्या काळात माणुसकीला प्राधान्य देणारा समाजच खऱ्या अर्थाने एकसंघ राहू शकतो.लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग राष्ट्रीय एकतेसाठी आवश्यक आहे. मतदान करणे, सार्वजनिक प्रश्नांवर जागरूक राहणे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात सहभाग घेणे, कायद्याचे पालन करणे आणि सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे ही नागरिकांची महत्त्वाची कर्तव्ये आहेत. लोकशाहीमध्ये मतभिन्नतेला स्थान असते. प्रत्येक नागरिकाला आपले मत मांडण्याचा आणि शासनाच्या निर्णयांवर टीका करण्याचा अधिकार आहे. मात्र मतभेद व्यक्त करताना हिंसा, द्वेष किंवा समाजविघातक मार्गांचा अवलंब होऊ नये. विरोधी विचार ऐकून घेणे, तर्कशुद्ध चर्चा करणे आणि लोकशाही मार्गाने मतभेद सोडविणे ही एकात्म समाजाची लक्षणे आहेत. राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि सार्वजनिक नेतृत्व यांनीही समाजात तेढ निर्माण करणाऱ्या भाषेऐवजी संवाद, सहकार्य आणि विकासाचा मार्ग स्वीकारला पाहिजे.राष्ट्रीय एकतेची सुरुवात प्रत्यक्षात आपल्या घरापासून आणि परिसरापासून होते. कुटुंबात मुलांना समानतेचे संस्कार देणे, शाळेत सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देणे, कामाच्या ठिकाणी भेदभाव टाळणे, सार्वजनिक ठिकाणी इतरांच्या अधिकारांचा आदर करणे आणि सामाजिक कार्यक्रमांत सर्वांना सहभागी करून घेणे या छोट्या कृतींतून एकतेची भावना विकसित होते. आपल्या परिसरात वेगवेगळ्या भाषा बोलणारे, विविध धर्मांचे किंवा वेगळ्या सामाजिक पार्श्वभूमीचे लोक राहत असतील, तर त्यांच्याशी संवाद आणि सहकार्य वाढविणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीची ओळख तिच्या जातीवर, धर्मावर किंवा भाषेवरून ठरविण्याऐवजी तिच्या माणूसपणाला महत्त्व देणे ही राष्ट्रीय एकतेची खरी सुरुवात आहे. सामाजिक सलोखा हा केवळ सार्वजनिक सभांमधून निर्माण होत नाही; तो दैनंदिन जीवनातील परस्पर सन्मान आणि सहकार्याच्या अनुभवांतून दृढ होतो.राष्ट्रीय एकता दिनानिमित्त देशभरात एकता दौड, शपथग्रहण, व्याख्याने, चर्चासत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय स्पर्धा आणि सामाजिक उपक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांमधून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला जातो. मात्र या उपक्रमांचा प्रभाव एका दिवसापुरता मर्यादित राहू नये. राष्ट्रीय एकतेची शपथ घेतल्यानंतर प्रत्यक्ष जीवनात भेदभाव करणारे वर्तन सुरूच राहिले, तर त्या शपथेचा उपयोग मर्यादित ठरतो. त्यामुळे अशा दिनविशेषांचे औचित्य साधून समाजातील वास्तव समस्यांवर चर्चा होणे, स्थानिक पातळीवर संवादाचे व्यासपीठ निर्माण होणे आणि सामाजिक सलोखा वाढविणारे उपक्रम राबविले जाणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि प्रसारमाध्यमे यांनी या प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावली पाहिजे.भारत आज विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, उद्योग, शेती, शिक्षण, क्रीडा आणि विविध क्षेत्रांत प्रगती करीत आहे. जागतिक पातळीवर देशाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी आर्थिक सामर्थ्याबरोबरच सामाजिक स्थैर्य आणि राष्ट्रीय एकात्मताही महत्त्वाची आहे. विकसित राष्ट्र होण्याचे ध्येय साध्य करताना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची फळे पोहोचली पाहिजेत. ग्रामीण, आदिवासी, दुर्गम आणि वंचित भागांतील नागरिकांना विकासाच्या प्रक्रियेत समान स्थान मिळाले पाहिजे. विविधतेचा सन्मान करणारी, सामाजिक न्यायाला प्राधान्य देणारी आणि सर्व नागरिकांना समान संधी उपलब्ध करून देणारी व्यवस्था निर्माण झाली, तर भारताचे राष्ट्रीय सामर्थ्य अधिक व्यापक होईल. देशाची प्रगती ही केवळ काही शहरांची, काही प्रदेशांची किंवा काही विशिष्ट समाजघटकांची प्रगती नसून ती प्रत्येक नागरिकाच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणारी असली पाहिजे.राष्ट्रीय एकता ही केवळ भावनिक संकल्पना नाही, तर ती सामाजिक न्याय, लोकशाही, समानता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठा यांवर आधारित सामूहिक जीवनपद्धती आहे. एकतेचा अर्थ मतभेद संपविणे नसून मतभेद असूनही एकमेकांशी संवाद साधण्याची क्षमता विकसित करणे हा आहे. विविधतेचा अर्थ विभाजन नसून परस्परांच्या वेगळेपणातून समृद्धी निर्माण करणे हा आहे. धर्म, जात, भाषा, प्रदेश आणि आर्थिक स्थिती यांपलीकडे जाऊन प्रत्येक नागरिकाला समान मानवी प्रतिष्ठा देणे ही राष्ट्रीय एकतेची कसोटी आहे. देशाच्या अखंडतेचे रक्षण करण्यासाठी केवळ सीमांवर जागरूक राहणे पुरेसे नाही; समाजातील मने जोडणे, विषमता कमी करणे आणि परस्परविश्वास वाढविणेही तितकेच आवश्यक आहे.३१ ऑक्टोबरचा राष्ट्रीय एकता दिन आपल्याला याच व्यापक जबाबदारीची जाणीव करून देतो. या दिनानिमित्त आपण केवळ राष्ट्रीय एकात्मतेच्या घोषणा देऊन थांबू नये, तर आपल्या विचारांत आणि कृतीत समता, सहिष्णुता, बंधुभाव आणि सहकार्याची मूल्ये रुजविण्याचा संकल्प केला पाहिजे. दुसऱ्याच्या भाषेचा, धर्माचा, संस्कृतीचा आणि विचारांचा आदर करणे, अन्याय व भेदभावाविरुद्ध उभे राहणे, अफवांपासून दूर राहणे आणि समाजातील दुर्बल घटकांना विकासाच्या प्रवाहात सहभागी करून घेणे या माध्यमातून राष्ट्रीय एकतेला प्रत्यक्ष बळ देता येईल. भारताची खरी ताकद त्याच्या विविधतेत आहे आणि त्या विविधतेला एकत्र बांधणाऱ्या बंधुभावात आहे. विविधतेचा सन्मान, समानतेचा स्वीकार आणि संविधानिक मूल्यांचे आचरण या त्रिसूत्रीवरच समर्थ, समृद्ध आणि एकसंघ भारताची उभारणी होऊ शकते. राष्ट्रीय एकता ही केवळ एका दिवसाची आठवण न राहता प्रत्येक भारतीयाच्या जीवनाचा अविभाज्य संस्कार बनली, तरच राष्ट्रीय एकता दिनाचा खरा हेतू साध्य होईल.

डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल —
bagate.rajendra5@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार ३१ ऑक्टोबर २०२६

विद्यापीठाप्रती निष्ठा आणि श्रमाची प्रतिष्ठा जपणारे व्यक्तीमत्त्व - प्रा. डॉ. प्रकाश देशमुख



31 ऑक्टोबर 2026 रोजी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थी सेवा विभागाचे संचालक प्रा. डॉ. प्रकाश देशमुख हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. वयाला आडवण माणसाच्या हातात नाही मात्र आपल्या कार्याचे बंधारे बांधून आठवणींचे तलाव आणि वैचारिक कार्यपरंपरा निर्माण नक्कीच करता येते. डॉ. प्रकाश देशमुख सरांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात कार्यरत असतांना आपल्या कार्यकतृत्वाने अनेक माणसे जोडली, अनेकांना मार्गदर्शन केले. आपल्या काम करण्याच्या शैलीने, शांत आणि संयमी वागणूकीने बहुतेकांना आपलेसे केले. विद्यापीठात नोकरी करतांना त्यांनी विद्यापीठाचे हीत जपले जाईल, त्याच्या नावलौकीकास नख लागणार नाही याची सतत काळजी घेतली. मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त अशा बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील वीडा नावाच्या एका खेड्यात जन्म झाला. वडील शिक्षक होते, शिक्षणाचा आणि चांगुलपणाचा वसा त्यांनी आपल्या आई-वडीलांकडून घेतला आणि आयुष्यभर तो चांगुलपणा त्यांनी जपला देखील. त्यांच्या घरी वारकरी सांप्रदायाची परंपरा आहे. वारकरी संप्रदाय हा जगातील सर्वात चांगला आणि प्रवाही संप्रदाय आहे. चांगल्या वाईट सगळ्यांना आपल्या सोबत घेऊन चालायचं, चांगल्यांना कायम सोबत ठेवायचं आणि वाईटांना चंद्रभागेत धुवून पवित्रा करायचं, जात, धर्म, पंथ, वर्ण या सर्वांच्या पलिकडे माणूस धर्माचे पालन करत. निराकार, निर्गुण होऊन जगायचं हे वारकऱ्यांचे तत्त्व त्यांनी सतत जोपासले. 1994 साली त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात समन्वयक म्हणून आपल्या कामाला सुरूवात केली. नोकरीत येण्यापूर्वी त्यांनी एम.कॉम., बी.एड., पर्यंतचे शिक्षण पूर्ण केलेले होते. नोकरी करत असतांना देखील त्यांनी ज्ञानाची आपली तहान शांत होऊ दिली नाही. या सेवा काळातच त्यांनी शिक्षणातील आधुनिक तंत्रज्ञान या विषयासह एम.एड., ही शिक्षण शास्त्रातील पदव्युत्तर पदवी मिळवली. मुक्त विद्यापीठातूनच एम्.फील. आणि पीएच.डी. या शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पदव्या मिळवल्या आणि याच विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक म्हणून 2002 ला रूजू झाले. त्यानंतर 2014 मध्ये सहयोगी प्राध्यापक झाले. या दरम्यान त्यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मुंबई विभागीय केंद्राचे संचालक म्हणूनही अतिशय चांगल्या पद्धतीने कार्य केले. आपल्या सेवा काळात त्यांनी मुंबई आणि नाशिक विभागाचे विभागीय संचालक, विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक, प्रभारी कुलसचिव आणि संचालक विद्यार्थी सेवा विभाग अशा महत्त्वपूर्ण पदांवर कार्य केले. त्यासोबतच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्यापरिषद, स्कुल कौंसिल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संशोधन आणि संलग्निकरण समिती, राष्ट्रीय सेवा योजना महाराष्ट्र राज्य सल्लागार समिती, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ (इग्नो) च्या ज्ञान वाहिनीवर सुकाणू समिती (Steering Committee), सदस्य, इंडियन कॉमर्स असोशिएशन नवी दिल्ली अशा विविध संस्थामध्ये सदस्य आणि सल्लागार म्हणून कार्य केले. वरील सर्व कार्य करीत असतांनाही त्यांनी आपल्यातील संशोधक जीवंत ठेवत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधून शिक्षण क्षेत्रातील विविध प्रवाह, महिला सबलीकरण, बँकींग, बदलते तंत्रज्ञान, मानवविकास, स्कील डेव्हलपमेंट अशा विविध विषयांवरील शोध निबंधांचे लेखन केले. त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेऊन ABP न्यूज, मुक्त विद्यापीठ, लायन्स क्लब यांनी त्यांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्कारांनी सन्मानित केले. प्रा. डॉ. प्रकाश देखमुख हे एक चांगले शिक्षक आहेत त्याहीपेक्षा ते एक चांगले सल्लागार आहेत. ते स्वत:ही चुकीचे काम करत नाहीत आणि कुणाला चुकीचा सल्लाही देत नाहीत याची प्रचिती मला अनेकदा आलेली आहे. नियमानुसार काम करणे, आपण करत असलेल्या कामामुळे कुणावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेणे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ही आपली कर्मभूमी आहे त्याच्या नावाची आणि कामाची बदनामी होता कामा नये याची त्यांनी सतत काळजी घेतली. दिलेले काम आपण चोखपणे केलेच पाहिजे हा त्यांचा शिरस्ता त्यांनी कायम जपला, विद्यापीठाच्या आणि शिक्षण तसेच संशोधनाच्या कामासाठी त्यांनी उभा आडवा महाराष्ट्र पालथा घातला. खूप प्रवास केला, दगदग केली त्याचा वपरित परिणाम त्यांच्या शरीरावर झाला. दोनदा त्यांना जीवदान मिळाले. काही वेळा त्यांनी मला बोलूनही दाखविले इनामदार सर आता मला थांबावे वाटतं. ते बोलले पण त्यांनी कधीच कुठलं काम थांबवले नाही. नियतीने त्यांना कितीही दाबण्याचे प्रयत्न केले तरी ते पुन्हा नव्या उमेदीने, जिद्दीने उभे राहिले. प्रा. डॉ. प्रकाश देखमुख यांची विद्यापीठाप्रती निष्ठा ही खरंच अफाट आहे. मी गेल्या 20 वर्षापासून या विद्यापीठाशी विविध नात्याने संबंधित आहे. या काळात मी अनेक संचालक, अधिकारी, कर्मचारी पाहिले जे अतिशय काटकसरीने काम करीत, पूर्वी विद्यापीठाचे कागद वाया जावू नये म्हणून वनसाइड पेपर दुसऱ्यांदा वापरत असत. देशमुख सरांनाही मी अनेकदा कागदाच्या बारिक चिट्ठ्या करून वापरतांना पाहिले आहे. मी अनेकदा त्यांना विविध कार्यक्रमासाठी बोलावलं पण त्यांनी विद्यापीठ वाहनाचा वापर खाजगी कामासाठी कधीच केला नाही. त्यांनी त्यांच्या पदाचा वापरही फार काळजीपूर्वक केला. डॉ. देशमुख सरांच्या सेवानिवृत्तीमुळे एक हळहळ कायम राहील की, आता विद्यापीठात अनेक संचालक असतील पण ते 10 ते 6 या वेळेत मात्र पूर्वीचे सर्व संचालक व्यक्तीश: अभ्यासकेंद्राच्या संपर्कात रहात, काही चुकीचे केले तर कान उघडणी करून नाराजी व्यक्त करत, चांगले केले तर तोंड भरून कौतुक करण्यासाठी स्वत: फोन करत, आता तसे 24x7 संचालक कमी झाले. त्या श्रृंखलेतले हे शेवटचे संचालक होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

असो सर्व भावना शब्दात बांधता येत नाहीत आणि कागदावर उमटवताही येत नाहीत. डॉ. प्रकाश देखमुख सर हे सेवेतून निवृत्त झाले तरी कार्यनिवृत्ती ते घेणार नाहीत. त्यांच्यातील शिक्षक त्यांना गप्प बसू देणार नाही. ते यापुढेही आपल्या लेखणी आणि वाणीतून समाजाची सेवा करतच राहतील यात शंका नाही. त्यांना सेवापूर्तीच्या हार्दिक शुभेच्छा आणि आरोग्यदायी दिर्घायुष्य लाभो अशा सदिच्छा!

प्रा. डॉ. हसन इनामदार

मो.9405109103

वाशिममध्ये समृद्धी महामार्गावर ठाकरे गटाचा रास्तारोको; दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना १ लाखांच्या मदतीची मागणी

वाशिम : राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत मिळावी, या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने आज वाशिम जिल्ह्यात आक्रमक पवित्रा घेतला. वाशिममधील शेलू बाजार परिसरातून जाणाऱ्या समृद्धी महामार्गावर ठाकरे गटाचे आमदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली हजारो शेतकरी आणि शिवसैनिकांनी भव्य रास्तारोको आंदोलन केले. यावेळी महामार्गावर चढण्याचा प्रयत्न करणाऱ्या आंदोलकांना पोलिसांनी रोखल्यामुळे मोठा तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी आमदार नितीन देशमुख यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. 'हेक्टरी एक लाख रुपये मदत द्या' राज्यात दुष्काळामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले असून, त्यांना मिळणारी मदत अतिशय तुटपुंजी आहे. शेतकऱ्यांची मदत वाढवून त्यांना सरसकट हेक्टरी एक लाख रुपये मदत देण्यात यावी, या मुख्य मागणीसाठी हे आंदोलन करण्यात आले. यासाठी हजारो दुष्काळग्रस्त शेतकरी, ठाकरे गटाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते रस्त्यावर उतरले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी आज समृद्धी महामार्ग रोखण्याचा निर्धार ठाकरे गटाने केला होता. यासाठी शेलू बाजार परिसरात मोठी गर्दी जमली होती. अकोला-आर्णी मार्गाच्या खाली आंदोलक जमा झाले होते आणि तेथून समृद्धी महामार्गावर चढण्यासाठी शेतकरी आणि शिवसैनिक मोठ्या प्रमाणात आक्रमक झाले.या मार्गावर पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. वाशिम जिल्ह्याच्या सीमेवरच आंदोलकांची वाहने अडवण्याचा प्रयत्न पोलिसांकडून करण्यात आला. अकोला-आर्णी मार्गाखाली पोलिसांनी बॅरिकेड्स लावून आंदोलनकर्त्यांना महामार्गावर जाण्यापासून रोखल्यामुळे पोलीस आणि कार्यकर्त्यांमध्ये मोठी झटापट झाली. यामुळे परिसरात मोठा तणाव निर्माण झाला होता. वाढता तणाव आणि महामार्ग रोखण्याचा आक्रमक प्रयत्न पाहता पोलिसांनी कारवाईला सुरुवात केली. कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून पोलिसांनी आंदोलनाचे नेतृत्व करणारे आमदार नितीन देशमुख यांच्यासह अनेक प्रमुख कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना ताब्यात घेतले आहे. सध्या या परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त असून परिस्थिती नियंत्रणात असली तरी तणावपूर्ण शांतता आहे. या आक्रमक आंदोलनामुळे ठाकरे गटाने शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला थेट कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे.